वाचले :

१. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४, दिनांक ०३ मार्च २०२२.
२. आदेश क्र. प्रशा/१८/कावि/२०६/२०२२, दि.१४ मार्च २०२२
३. आदेश क्र. प्रशा/२/कावि/२२८/२०२२ दि.१४ मार्च २०२२
४. आदेश क्र.प्रशा/२/कावि/६१४/२०२२ दिनांक २५ जुलै, २०२२मा
५. .आयुक्त तथा प्रशासक यांचेकडील दिनांक ७/०२/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -४११०१८,
सामान्य प्रशासन विभाग,
क्र.साप्रवि/२/कावि/८३/२०२५
दिनांक :७ /०२/२०२५

**विषय : जनसंवाद सभेकरीता मुख्य समन्वय अधिका-यांची नियुक्ती करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड शहरातील सन्माननीय नागरिक आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद राखण्यासाठी, तक्रारींचे निवारण जलदगतीने करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालय निहाय जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. तथापि, जनसंवाद सभेकरीता मुख्य समन्वय अधिकारी यांची यापुर्वी नियुक्ती करण्यात आलेले आदेश अधिक्रमित करण्यात येत असून प्रशासकीय कामकाजाचे सोयीचे दृष्टीने जनसंवाद सभेकरीता क्षेत्रीय कार्यालय निहाय मुख्य समन्वय अधिकारी म्हणून खालील अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुख्य समन्वय अधिकारी | क्षेत्रीय कार्यालय |
|---|---|---|
| १ | श्री. अण्णा यशवंतराव बोदडे, उप आयुक्त | अ |
| २ | श्री. विजयकुमार चंद्रभान काळे, सह शहर अभियंता (स्था) | ब |
| ३ | श्री. देवन्ना नरसिमह्लु गट्टुवार, सह शहर अभियंता (स्था) | क |
| ४ | श्री. पंकज भगवानराव पाटील, उप आयुक्त | ड |
| ५ | श्री. अजय दिनकर सुर्यवंशी, सह शहर अभियंता (स्था) | इ |
| ६ | श्री. मनोज सेठीया, सह शहर अभियंता (स्था) | फ |
| ७ | श्री. मनोज नंदकुमार लोणकर, उप आयुक्त | ग |
| ८ | श्री. निलेश शशिकांत भदाणे, उप आयुक्त | ह |

सर्व मुख्य समन्वय अधिका-यांनी प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या सोमवारी सकाळी १०:०० ते १२:०० या वेळेत क्षेत्रीय कार्यालयांमध्ये वेळेत उपस्थित राहून जनसंवाद सभेचे अध्यक्षस्थान भूषवावे. संबंधित क्षेत्रीय अधिकारी व सर्व विभागांचे विभागस्तरावरील अधिकारी सदर सभेस उपस्थित असतील. सदर आदेशाची अंमलबजावणी दि. ०१ /०२/२०२५ पासून करण्यात यावी.

मुख्य समन्वय अधिकारी सर्व सन्माननीय नागरिकांना मागील आठवड्यात मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी घेतलेले महत्वाचे निर्णय, मा. महाराष्ट्र शासन तसेच महानगरपालिकेच्या विविध योजना, महत्वाची परिपत्रके याविषयी माहिती देतील. तदनंतर प्रत्येक सन्माननीय नागरिकाला दालनामध्ये बोलावून त्यांची तक्रार नोंदवून घेतील व शक्य असल्यास तिथेच संबंधित अधिका-यांशी चर्चा करून मार्ग काढतील. मुख्य समन्वय अधिकारी तक्रार नोंदणी व अभिलेख जतन करण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील लघुलेखक किंवा मुख्य लिपिक यांना देखील सोबत ठेवतील. तक्रार निवारणासाठी जास्त अवधीची गरज असल्यास मुख्य समन्वय अधिकारी संबंधित सन्माननीय नागरिकाला त्याची माहिती देतील आणि तक्रार विषयक नोंदणी करून मा. आयुक्त तथा प्रशासक कार्यालयाशी संबंधित तक्रारी सहाय्यक आयुक्त (प्रशासन) यांच्याकडे पाठवतील. सदर तक्रारीविषयी मा. अतिरिक्त आयुक्त (प्रशासन) यांच्याकडे दर मंगळवारी सकाळी १०:०० ते १२:०० मध्ये मा. आयुक्त तथा प्रशासक कार्यालयातील सर्व संबंधित अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात

येईल. या बैठकीत निवारण न झालेल्या तसेच जास्त अवधीशी संबंधित किवा धोरणात्मक निर्णयांशी संबंधित तक्रारीविषयक बैठक मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे दर शुक्रवारी संबंधित विभागप्रमुखांसोबत करण्यात येईल.

सदर आदेशाचा अंमल तात्काळ लागू होईल.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,

१. अतिरिक्त आयुक्त १, २, ३, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
२. सर्व संबंधित विभाग,